**FORM G**

**INVITATION FOR EXPRESSION OF INTEREST FOR WARDEN SURGICAL COMPANY PRIVATE LIMITED (UNDER CIRP) OPERATING AT PUNE, MAHARASHTRA – 411 016**

(Under Regulation 36A(1) of the Insolvency and Bankruptcy Board of India (Insolvency Resolution Process for Corporate Persons) Regulations, 2016)

| **RELEVANT PARTICULARS** | | |
|---|---|---|
| 1. | Name of the corporate debtor along with ~~PAN/~~ CIN~~/ LLP No~~. | WARDEN SURGICAL COMPANY PRIVATE LIMITED<br>CIN: U24239MH1970PTC014516 |
| 2. | Address of the registered office | 7/8,PAREL HOUSE,DR,BORGES ROAD PAREL Mumbai MH 400012 IN |
| 3. | URL of website | http://wardensurgical.com/ |
| 4. | Details of place where majority of fixed assets are located | Factory Office: 75/76, Jawahar Co-op. Industrial Estate, Kamothe, Navi Mumbai - 410 209 |
| 5. | Installed capacity of main products/ services | The company has only one segment of revenue i.e. Manufacturer in Hospital Equipments;<br><br>The installed capacity of main products cannot be defined |
| 6. | Quantity and value of main products/ services sold in last financial year | Revenue:<br>From sale of manufactured goods:<br>Rs. 1,86,81,208 /-<br>From resale of goods:<br>Rs. 1,74,60,933 /-<br>For further information, please email wardencirp@gmail.com |
| 7. | Number of employees/ workmen | 23 employees |
| 8. | Further details including last available financial statements (with schedules) of two years, lists of creditors, relevant dates for subsequent events of the process are available at: | Flat No. 7, Indrayani, Ganesh Nagar, Opp.Lekha Nagar, Agra Road, Nashik, Maharashtra - 422 009 |
| 9. | Eligibility for resolution applicants under section 25(2)(h) of the Code is available at: | The detailed Invitation for Expression of Interest (EoI) mentioning eligibility criteria can be sought by an email to:<br><br>wardencirp@gmail.com |
| 10. | Last date for receipt of expression of interest | 9th April, 2023 |
| 11. | Date of issue of provisional list of prospective resolution applicants | 19th April, 2023 |
| 12. | Last date for submission of objections to provisional list | 24th April, 2023 |
| 13. | Process email ID to submit EOI | wardencirp@gmail.com |

**FORM G**
**INVITATION FOR EXPRESSION OF INTEREST FOR**
**WARDEN SURGICAL COMPANY PRIVATE LIMITED (UNDER CIRP)**
**OPERATING AT PUNE, MAHARASHTRA – 411 016**

(Under Regulation 36A(1) of the Insolvency and Bankruptcy Board of India (Insolvency Resolution Process for Corporate Persons) Regulations, 2016)

Sd/-
Shashant Sudhakar Yeola
Resolution Professional
IBBI Registration No.: IBBI/IPA-001/IPP00310/2017-18/10574
Flat No. 7, Indrayani, Ganesh Nagar, Opp.Lekha Nagar,
Agra Road,Nashik,Maharashtra ,422009
For Warden Surgical Company Private Limited (Under CIRP)

Date: 25/03/2023
Place: Nashik

# वीर सावरकर अवमान प्रकरणाचे पडसाद मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे जोरदार प्रत्युत्तर



■ मुंबई

**वीर** सावरकरांविषयी राहुल गांधी यांनी अवमानकारक वक्तव्य केल्यामुळे गुरुवारी भाजपा - शिवसेनेच्या आमदारांनी विधिमंडळाच्या पायऱ्यांवर जोडेमारो आंदोलन केले होते. मात्र, त्यावर काँग्रेस-राष्ट्रवादीने शुक्रवारी देखील आक्षेप घेत सभागृहात हा मुद्दा उपस्थित केला. सत्ताधारी आमदारांकडूनही त्याला जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले. त्यामुळे गोंधळ निर्माण झाल्याने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सभागृहाचे कामकाज तीन वेळा तहकूब केले. त्यानंतर सभागृहाचे कामकाज सुरू होताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हस्तक्षेप करीत काँग्रेस-राष्ट्रवादीचा कठोर शब्दांत समाचार घेतला. तुमचे नेते स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा वारंवार अवमान करीत आहेत. पण, सावरकरांचा अवमान करणे हे देशद्रोहाचे काम आहे', अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काँग्रेस-राष्ट्रवादीचा समाचार घेतला.. शिंदे म्हणाले, नाना पटोले तुम्हाला एकच सांगतो, जेव्हा आपण दुसऱ्याकडे बोट दाखवतो, तेव्हा आपल्याकडे तीन बोटं असतात. त्यामुळे सभागृहाचे पावित्र्य प्रत्येकाने जपले पाहिजे. सावरकरांचा वारंवार अवमान करणे हे देशद्रोहाचे काम आहे. आम्ही बोलत नाही याचा अर्थ आम्ही बोलू शकत नाही, असा घेऊ नका. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाचे नाव जगभरात पोहोचवले. त्यांच्याविषयी तुम्ही अवमानकारक बोलता. राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम ज्यांच्या नसानसात भिनले आहे, त्यांच्याविषयी तुमचा नेता असे वक्तव्य करतो. आमच्या लोकांचे फोटो, पोस्टर झळकावत नको नको ते बोलले गेले. गद्दार, खोके घेतले म्हणून हिणवले गेले, ते तुम्हाला चालले का? असा सवाल मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी उपस्थित केला.एकनाथ शिंदे म्हणाले, मुख्यमंत्र्यांना खोके म्हणणे, मिंधे म्हणणे, चोर किंवा गद्दार म्हणणे हे कुठल्या आचारसंहितेत बसते नाना? असा सवाल शिंदे यांनी काँग्रेस आमदार नाना पटोले यांना केला. शिंदे म्हणाले की, आम्ही जोडे मारण्याचे समर्थन केले नाही, करणारही नाही. परंतु स्वातंत्र्यवीर सावरकरांचा वारंवार अवमान करणे हे देशद्रोहाचे काम आहे. सावरकरांचा अवमान आम्ही सहन करणार नाही.

पुढे एकनाथ शिंदे म्हणाले, नाना तुम्हाला वैयक्तिक घेण्याची गरज नाही. आपल्या देशाची कीर्ति जगभरात पोहोचवण्याचे काम पंतप्रधान मोदी यांनी केले. त्यामुळे पंतप्रधानांचा अवमान सहन करणार नाही. लोकशाही धोक्यात आहे असे विरोधक म्हणाले, तर भारत जोडो यात्रा कशी निघाली? असा सवाल मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी उपस्थित केला.

# सावरकर अवमानप्रकरणी गदारोळ! मुनगंटीवार संतापले

■ मुंबई

विधानसभेत गुरुवारप्रमाणे शुक्रवारीही गदारोळ पाहायला मिळाला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात विधानसभेत घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार संतापले आणि म्हणाले की, 'देशाचे पंतप्रधान आहेत नरेंद्र मोदी. २३ कोटी मतदारांनी निवडून दिले आहे. कुणाच्या औकातीत नाही हे. कुणाच्या भीकेवर ते पंतप्रधानपद नाही.'

यानंतर सभागृहाचे कामकाज तीन वेळा स्थगित करण्यात आले.. त्यानंतर सभागृहाचे कामकाज सुरू झाले आणि यासंदर्भात शनिवारी सकाळी निकाल देणार असल्याचे विधानसभा अध्यक्षांनी सांगितले.

विधिमंडळाच्या पायऱ्यांवर गुरुवारी काँग्रेस नेते राहुल गांधींच्या फोटोला जोडे मारो आंदोलन सत्ताधारी आमदारांनी केल्यामुळे सभागृहात गदारोळ झाला होता. यावेळी विधानसभा विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी या आंदोलनावर आक्षेप नोंदवला होता. त्यानुसार विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी यासंदर्भात तपास करून कारवाई करणार असल्याचे सांगितले होते. पण अद्याप कोणतीही कारवाई झाली नसल्यामुळे शुक्रवारी काँग्रेस नेते नाना पटोले यांनी संबंधितांच्या निलंबनाची मागणी केली पटोलेंच्या या मागणीवर भाजप आमदार आशिष शेलार यांनी सवाल उपस्थित केला. ते म्हणाले की, याच सदनाच्या पायऱ्यांवर मुख्यमंत्र्यांना खोके-बोके म्हणतात, तेव्हा काय होते? मुख्यमंत्री संविधानिक पदावर बसलेले नाहीत का? मुख्यमंत्र्यांना खोके-बोके म्हटले जाते ते कसे चालते?, असा सवाल शेलारांनी उपस्थित केला. याच दरम्यान विरोधी बाकांवरून 'मोदी चोर है' अशी घोषणाबाजी करण्यात आली. हा वाद आणखी पेटू नये म्हणून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी यात मध्यस्थी करून अहवाल तपासून निर्णय घेऊ, असे सभागृहाला सांगितले. पण तरीदेखील सभागृहातील गोंधळ हा



काही थांबला नाही. त्यावेळेस भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार संतापले.

मुनगंटीवार म्हणाले की, 'देशाचे पंतप्रधान आहेत नरेंद्र मोदी. २३ कोटी मतदारांनी निवडून दिले आहे. कुणाच्या औकातीत नाही हे. कुणाच्या भीकेवर ते पंतप्रधान पद नाही. पळपुट्या माणसाच्या पक्षाने मोदींना चोर म्हणणे सहन करणार नाही. ती तर बाहेरची भूमिका होती. पण सभागृहात मोदींना चोर म्हटले गेले आहे.'

# विरोधकांचा आवाज दाबण्याचा प्रकार काँग्रेस हा लढा रस्त्यावर उतरून लढेल

■ मुंबई

राहुल गांधी यांची खासदारकी रद्द करण्याच्या निर्णयाच्या निषेधार्थ काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसने शुक्रवारी विधानसभेतून सभात्याग केला. राहुल गांधींची खासदारकी रद्द करणे अत्यंत दुर्दैवी व लोकशाही विरोधी घटना आहे. हा विरोधकांचा आवाज दाबण्याचा प्रकार आहे, असा आरोप या पक्षांनी या प्रकरणी केला. त्यानंतर विधानसभेच्या पायऱ्यांवर या कारवाईच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी केली.. या प्रकरणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विधिमंडळाबाहेर पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी ही घटना अत्यंत दुर्दैवी व लोकशाहीविरोधी असल्याचा आरोप केला. 'नरेंद्र मोदी सरकारने लोकसभा अध्यक्षांच्या माध्यमातून आज राहुल गांधी यांची खासदारकी रद्द केली. हा लोकशाहीविरोधी निर्णय आहे. मेहुल चोकशी, नीरव मोदी, ललित मोदी आदी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मित्र हजारो कोटींचा चुना लावून देशातून पळून गेलेत. राहुल गांधी यांनी याविरोधात आवाज बुलंद करत आहेत. पण त्यांचा आवाज दाबला जात आहे,' असे पटोले म्हणाले.

'राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदींच्या आडनावाप्रकरणी केलेल्या विधानाप्रकरणी सुरत न्यायालयात खोटा खटला दाखल करण्यात आला. त्यानंतर आता राहुल गांधींचे संसद सदस्यत्व रद्द करण्याचे पाप सरकारने केले. सरकारने ही कारवाई ठरवून केली. भाजप देशात लोकशाही विरोधी व्यवस्था तयार करण्याचे काम करत आहे. हे संविधान विरोधी कृत्य असून, काँग्रेस हा लढा रस्त्यावर उतरून लढेल,' असेही पटोले यावेळी म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनीही या प्रकरणी मोदी सरकारवर निशाणा साधला. 'लोकसभेत अशा प्रकारची दुसऱ्यांदा कारवाई करण्यात आली आहे. काही महिन्यांपूर्वी राष्ट्रवादीचे मोहम्मद फैजल यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले होते. त्यानंतर आज राहुल गांधींवर कारवाई करण्यात आली. राजकारणात वैचारिक मतभेद असतात. पण देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून अशी कारवाई कुणावरही केल्याचे आठवत नाही. ही कारवाई लोकशाहीला धरून नाही,' असे ते म्हणाले...यापूर्वी इंदिरा गांधींच्या बाबतीत असेच घडले होते. तत्कालीन सरकार इंदिरांविरोधात असेच वागले होते. पण त्यानंतर जनतेने निवडणुकीच्या माध्यमातून हे सरकार पाडून इंदिरांकडे देशाची सूत्रे सोपवली. आताही भारतीय जनता हे सहन करणार नाही. सध्या घडणाऱ्या घटना सर्वसामान्य माणसाला न पटणाऱ्या घटना आहेत,' असेही अजित पवार यावेळी म्हणाले.

# विधीमंडळाच्या पायऱ्यावर सत्ताधारी नेत्यांच्या फोटोला निरमाने आंघोळ

■ मुंबई

महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधिमंडळाच्या पायऱ्यावर सत्ताधारी नेत्यांच्या फोटोला निरमाने आंघोळ घातली आहे. यावरच न थांबता गुजरातचा निरमा, क्लीनचिट मिळवाच्या घोषणा ही दिल्या. गुजरातचा निरमा, क्लीनचिट मिळवा. पन्नास खोके, एकदम ओके गुजरात निरमा, ईडी, सीबीआय, आयटी मागे नाही लागणार. वॉशिंग मशीन खोके, आणि गुजरातचा निरमा, महाशक्तीला पाठिंबा द्या आणि क्लीनचिट मिळवा. गुजरात निरमा अभियान, चला पवित्र होऊन येऊ. अशा घोषणा देत महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर येत निदर्शने केली. गुजरातची निरमा आणि वॉशिंग मशीनचे बॅनर घेऊन महाविकास आघाडीच्या आमदारांनी जोरदार घोषणाबाजी करत विधानभवनाचा परिसर दणाणून सोडला.




# राहुल गांधींची खासदारकी रद्द करण्याचा निर्णय लोकशाहीला धक्का देणारा आहे! पवारांची नाराजी

■ मुंबई

**राहुल** गांधी यांची खासदारकी रद्द करणे ही बाब संविधानात किंवा लोकशाहीत बसत नाही. लोकशाहीत प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार घटनेने दिला आहे. तरीदेखील संसदेत अशी खासदारकी रद्द करण्याचा निर्णय घेतला जो लोकशाहीला धक्का देणारा आहे अशा शब्दात विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत या घटनेचा माध्यमांशी बोलताना धिक्कार केला. मतमतांतरे असली तरी देशाच्या स्वातंत्र्यानंतर अशाप्रकारे कोणाची खासदारकी रद्द करण्याची घटना घडलेली नाही असे स्पष्ट मतही अजित पवार यांनी व्यक्त केले.

काँग्रेसचे नेते राहूल गांधी यांची खासदारकी रद्द करण्याचा मुद्दा आमदार नाना पटोले यांनी सभागृहात उपस्थित केला त्यानंतर महाविकास आघाडीच्या आमदारांनी मोदी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करत सभात्याग केला. त्यानंतर अजित पवार यांनी माध्यमांशी संवाद साधला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला घटना दिली. त्यांनी दिलेल्या शिकवणीत अशी भूमिका बसत नाही असेही अजित पवार यावेळी म्हणाले. अशा घटना व सर्व प्रकार जनता बघत आहे. राज्यकर्त्यांनी सगळ्यांना सोबत घेऊन जायचे असते या देशाच्या परंपरेला तिलांजली देण्याचे काम झाल्याचा आरोपही अजित पवार यांनी यावेळी केला.

## फोडा आणि झोडा ही सत्ताधाऱ्यांची निती

राज्यात गुंडगिरी वाढली आहे, धार्मिक तेढ वाढली आहे. फोडा आणि झोडा अशी निती सत्ताधाऱ्यांनी राबवायला सुरुवात केली आहे असा आरोप विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी विधानसभेत केले. विरोधी पक्षाच्या वतीने उपस्थित करण्यात आलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावाची सुरुवात करताना ते बोलत होते. राज्यात धमक्यांचे सत्र सुरु आहे त्यातून खुद्द मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, स्वा. शरद पवार यांनाही सुटका मिळालेली नाही, त्यात सर्वसामान्यांचे काय असा सवाल त्यांनी केला. विरोधी पक्षाच्या आजी, माजी आमदारांना ACB च्या नोटीसा बजावण्यात आल्या आहेत, आमदारांवर हल्ले होत आहेत, हसन मुश्रीफ यांच्यावर ई डी च्या धाडी पडताहेत , विरोधकांकडे बोट दाखवून राजकारण करण्याची पद्धत सुरु झाली आहे अशी टीका त्यांनी यावेळी केली.

# ईडी-सीबीआयविरोधात १४ विरोधी पक्षांची सुप्रीम कोर्टात धाव

■ नवी दिल्ली

**देशातील** विरोधी पक्षांच्या नेत्यांवर केंद्रीय तपास संस्थाकडून होत असलेल्या कारवायांविरोधात विरोधी पक्षांनी सामूहिकपणे सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. १४ राजकीय पक्षांनी शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात तपास संस्थांच्या दुरुपयोगाच्या विरोधात न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर ५ एप्रिलला सुनावणी घेतली जाणार असल्याचे न्यायालयाकडून सांगण्यात आले आहे. विशेष म्हणजे तपास संस्थांचा दुरूपयोग होत असल्याचा आरोप करत ८ राजकीय पक्षांच्या ९ नेत्यांनी अलीकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिले होते. काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, आम आदमी पार्टी, झारखंड मुक्ती मोर्चा, जनता दल युनायटेड, भारत राष्ट्र समिती, राष्ट्रीय जनता दल, समाजवादी पक्ष, शिवसेना (उद्धव ठाकरे), राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, सीपीआय, सीपीएम, डीएमके आणि नॅशनल कॉन्फरन्स या १४ राजकीय पक्षांच्या वतीने याचिका दाखल करण्यात आली आहे. तपास संस्थांच्या दुरुपयोगामुळे लोकशाही धोक्यात आली असल्याचे काँग्रेसचे नेते व ज्येष्ठ वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी याचिका दाखल झाल्यानंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले. तपास संस्थानी ज्या कारवाई करत आहेत, त्यात ९५ टक्के नेते विरोधी पक्षांचे आहेत. अशा स्थितीत सर्वोच्च न्यायालयाने अटकपूर्व आणि अटकेनंतर मार्गदर्शक तत्वे आखणे आवश्यक बनले असल्याचे सिंघवी यांनी नमूद केले.

# आशा भोसलेंना 'महाराष्ट्र भूषण' प्रदान! फडणवीसांकडून कौतूक

■ मुंबई

**ज्येष्ठ** गायिका आशा भोसले यांना आज रात्री मुंबईत महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भारतरत्न सचिन तेंडूलकर, सुधीर मुनगंटीवार, सुरेश वाडकर, जॅकी श्रॉफ, उदित नारायण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या सोहळ्यात फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राचा सर्वोच्च पुरस्कार आशाताईंना देताना आम्हाला खूप आनंद होतो आहे. आपण अनेकवेळा व्हर्सेटाईल शब्द वापरतो. त्या शब्दाची व्याख्या म्हणजे आशाताई आहेत. त्यांनी गायलेली गाणी खूप अवीट आहे. त्यांनी भक्तीगीत ते पॉप, रॉकपर्यंत सर्व प्रकारची गाणी गायली आहेत.

२० भाषांमध्ये त्यांनी गाणी म्हटली आहेत. हजारो गाणी त्यांनी गायली आहेत. त्या प्रत्येक गाण्यात त्यांनी वेगळेपण जपले आहे. शतकामध्ये दुसऱ्या आशा भोसले होत नाही. मंगेशकर कुटुंबियांनी जी संगीताची सेवा केली ती अविस्मरणीय आहे.कुठलाही पुरस्कार त्या सेवेपुढे छोटाच आहे. आपलेपण पोहचवण्याचा छोटासा प्रयत्न असल्याचेही फडणवीस म्हणाले.


**फॉर्म जी**
**नवी मुंबई - ४१० ०२९ येथे कार्यरत**
**वॉर्डन सर्जिकल कंपनी प्रायव्हेट लिमिटेड (सीआयआरपी अंतर्गत)**
**करिता स्वारस्य अभिव्यक्तीचे आमंत्रण**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए (१) अन्वये)

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव व सीआयएन | वॉर्डन सर्जिकल कंपनी प्रायव्हेट लिमिटेड सीआयएनः U24239MH1970PTC014516 |
| २. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | ७/८, परेल हाऊस, डॉ. बोर्जेस रोड, परेल, मुंबई महा. ४०००१२ भारत |
| ३. | वेबसाईटचे यूआरएल | http://wardensurgical.com/ |
| ४. | बहुसंख्य अचल संपत्ती असलेल्या जागेचा तपशील | फॅक्टरी कार्यालयः ७५/७६, जवाहर को-ऑप. इंडस्ट्रियल इस्टेट, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९. |
| ५. | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | कंपनीकडे महसुलाचा फक्त एक विभाग म्हणजेच रुग्णालय उपकरणांचे उत्पादक आहे, मुख्य उत्पादनांची स्थापित क्षमता वर्णन करता येणार नाही. |
| ६. | गत वित्तीय वर्षामध्ये विक्री झालेल्या मुख्य उत्पादने/सेवांचे परिमाण आणि मूल्य | महसूलः उत्पादित वस्तुंच्या विक्रीमधूनः रु. १,८६,८१,२०८/- वस्तुंच्या पुनर्विक्रीमधूनः रु. १,७४,६०,९३३/- अधिक माहितीकरिता, कृपया ईमेल करा wardencirp@gmail.com |
| ७. | कर्मचारी/कामगारांची संख्या | २२ कर्मचारी |
| ८. | गत उपलब्ध दोन वर्षांची वित्तीय विवरणपत्रे (वेळापत्रकासह), धनकोंची यादी, त्यानंतरच्या प्रक्रियेच्या घटनांच्या संबंधित तारखा समाविष्ट असलेले पुढील तपशील उपलब्ध असण्याचे ठिकाणः | सदनिका क्र. ७, इंद्रायणी, गणेश नगर, लेखा नगरसमोर, आग्रा रोड, नाशिक, महाराष्ट्र-४२२००९. |
| ९. | संकेताच्या कलम २५(२)(एच) अन्वये ठराव अर्जदाराची पात्रता उपलब्ध असण्याचे ठिकाणः | पात्रता निकष उल्लेखिलेले स्वारस्य अभिव्यक्तीकरिता (ईओआय) तपशीलवार आमंत्रण wardencirp@gmail.com येथे ईमेल पाठवून प्राप्त करता येईल. |
| १०. | स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याकरिता अंतिम दिनांकः | ९ एप्रिल, २०२३ |
| ११. | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी पारित करण्याचा दिनांक | १९ एप्रिल, २०२३ |
| १२. | तात्पुरत्या यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | २४ एप्रिल, २०२३ |
| १३. | ईओआयकडे सादर करण्यासाठी प्रक्रिया ईमेल आयडी | wardencirp@gmail.com |

सही/-
शशांत सुधाकर येवला
ठराव व्यावसायिक
आयबीबीआय नोंदणीकरण क्रमांकः IBBI/IPA-001/IPP00310/2017-18/10574
सदनिका क्र. ७, इंद्रायणी, गणेश नगर, लेखा नगर समोर,
आग्रा रोड, नाशिक, महाराष्ट्र ४२२००९.
दिनांकः २५.०३.२०२३
ठिकाणः नाशिक
वॉर्डन सर्जिकल कंपनी प्रायव्हेट लिमिटेड (सीआयआरपीअंतर्गत) करिता


# ॲक्सेंचरकडून मोठी नोकर कपात १९ हजार कर्मचाऱ्यांना नारळ

■ डबलिन

**भारतात** मोठ्या प्रमाणावर सेवा देणाऱ्या जागतिक आयटी सेवा कंपनी ॲक्सेंचरने गुरूवारी (२३ मार्च) आर्थिकस्थिती आणि मंदावलेल्या महसूल यांच्या पार्श्वभूमीवर सुमारे १९ हजार नोकरकपातीची घोषणा केली. आर्थिक वर्ष २०२३च्या दुसऱ्या तिमाहीसाठी कंपनीचे तिमाही निकाल घोषित करताना कंपनीने तिची वार्षिक महसूल वाढ आणि नफ्याचा अंदाज देखील कमी केला.

ॲक्सेंचर ही जागतिक पातळीवर सर्वात मोठ्या टेक कंपन्यांपैकी एक आहे. क्सेंचरच्या अलीकडील वार्षिक अहवालात २०२२ मध्ये ७ लाख २१ हजार कर्मचारी असल्याचे म्हटले होते. कंपनीने गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये संपलेल्या२०२२ आर्थिक




वर्षात सुमारे एक लाख लोकांना कामावर घेतले होते. कंपनीच्या मुख्य कार्यकारी ज्युली स्वीट यांनी गुरुवारी सांगितले की, 'आम्ही चक्रवाढ वेतन महागाईच्या कठीण आव्हानांना सामोरे जात आहोत आणि आम्ही ते किंमतीसह करत आहोत परंतु आम्ही ते खर्च कार्यक्षमता आणि डिजिटायझिंगसह देखील करत आहोत.'

यावेळी कंपनीने म्हटले की, 'जगभरातील अनेक बाजारपेठांमध्ये लक्षणीय आर्थिक अनिश्चितता आहे. ज्याचा आमच्या व्यवसायावर परिणाम झाला आहे आणि त्याचा परिणाम होत राहील, विशेषतः विदेशी चलन विनिमय दरांमधील अस्थिरतेच्या संदर्भात परिणाम जाणवत आहे.'

## इनडीडकडून २,२०० कर्मचारी कपात

जॉब पोर्टल इनडीडने २२०० कर्मचारी काढून टाकले आहेत. ज्या कंपनीचे ध्येय लोकांना नोकऱ्या मिळवून देणे हे आहे त्यांच कंपनीने हा निर्णय घेतला. सीईओच्या म्हणण्यानुसार, 'ते मूळ वेतनात २५ टक्के कपात करणार आहेत. त्यापैकी निम्म्या नोक-या प्रशासकीय किंवा सपोर्ट फंक्शन्स विभागातील आहेत. ग्राहकांचे बिलिंग होते त्या विभागातील नोक-या जाणार नाही.'

विदेश वृत्त

# केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ

**नवी दिल्ली- पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यामध्ये ४ टक्क्यांनी वाढवण्याचा निर्णय घेतला. केंद्र सरकारने महागाई भत्ता ३८ टक्क्यांवरून ४२ टक्के केला आहे.

केंद्रीय कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता आणि पेन्शनधारकांच्या महागाई सवलतीत वाढ करण्याचा निर्णय १ जानेवारी २०२३ पासून लागू केला जाणार आहे. या निर्णयामुळे केंद्र सरकारच्या तिजोरीवर वार्षिक १२,८१५ कोटींचा भार पडणार आहे. या निर्णयाचा फायदा ४७.५८ लाख कर्मचारी आणि ६९.७६ लाख पेन्शनधारकांना होणार आहे. ही वाढ सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या आधारे केलेल्या सूत्रानुसार निश्चित करण्यात आली आहे.

# सर्वोच्च न्यायालय पंतप्रधानांना पदावरून हटवू शकणार नाही

■ तेल अवीव

**इस्रायल संसदेत नवे विधेयक मंजूर**

**इस्रायलमध्ये** गुरुवारी सरकारकडून नवीन विधेयक मंजूर करण्यात आले. सर्वोच्च न्यायालय पंतप्रधानांना पदावरून हटवू शकणार नाही, असा कायदा संसदेत मंजूर करण्यात आला. पंतप्रधान शारीरिक किंवा मानसिकदृष्ट्या अक्षम असल्यास केवळ सरकार त्यांना अपात्र ठरवून तात्पुरते पदावरून काढू शकते. त्यासाठी तीन चतुर्थांश खासदारांचा पाठिंबा आवश्यक असणार आहे.

# हिंडेनबर्गच्या निशाण्यावर अमेरिकन कंपनी

■ वॉशिंग्टन

**अदानी** समूहानंतर हिंडेनबर्ग रिसर्चने अमेरिकेतील कंपनी ब्लॉक इंक (ब्लॉक आयएनसी) च्या विरोधात एक अहवाल सादर केला. गुरुवारी २३ मार्चला हा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. ट्विटरचे माजी सीईओ जॅक डॉर्सी यांची मोबाईल पेमेंट कंपनी ब्लॉक इंकने ग्राहक व सरकारची फसवणूक केल्याचा आरोप हिंडेनबर्गने आपल्या अहवालात केला आहे. आम्ही दोन वर्षे याबाबत संशोधन करत आहोत. ब्लॉक इंक कंपनीने नागरिकांना मदत करण्याचा दावा केला. परंतू कंपनीने नागरिकांचा गैरफायदा घेतला. आपल्या यूजर्सची संख्या वाढवून सांगितली, असे हिंडेनबर्गच्या अहवालात म्हटले आहे.


**TENDER NOTICE**

Tenders are invited from reputed contractors having minimum 10 years experience of carrying outstructural repairs, plastering, waterproofing, painting & plumbing; for Repairs & Painting of **ST. PAUL CHURCH** building at 205, Dr. Ambedkar Road, Dadar East, Mumbai 400 014.

Tenders can be collected from M/s Rehab Consultants Pvt. Ltd., 27, Neelam Gulzar, Highway Service Road, Off Andheri Sahar Road, Near Jaisingh Business Centre, Andheri East, Mumbai 400099, on or before 31.03.2023 between 11 A.M. to 5P.M. on weekdays. Tender prices will be Rs.1,500/- in cash non refundable.



**डहाणू नगरपरिषद**
**ता. डहाणू, जि. पालघर**
**निविदा सूचना**

जा.क्र. डनप/ ४६३०/२०२२-२३ दिनांकः २४/०३/२०२३

मुख्याधिकारी डहाणू नगरपरिषद हे खालील कामाकरिता निविदा मागवीत आहे.

| अ. क्र. | विभाग | कामाचे नांव | निविदा फॉर्म किंमत | निविदेसोबत भरावयाची सुरक्षा अनामत |
|---|---|---|---|---|
| १ | पाणी पुरवठा विभाग | डहाणू नगर परिषद हद्दीत मसोली प्रभू पाडा येथे श्री. हरी माळी यांच्या घरापासून ते सेंट मेरीज हायस्कूल मेनरोडपर्यंत जलवाहिनी टाकणेसाठी ९१४ मीटर 4" HDPE पाईप पुरवठा करणे. | रू.५०० | रू.१५००० |
| २ | | डहाणू नगर परिषद हद्दीत पारनाका येथे सार्वजनिक शौचालय, भाजी मार्केट मागील सार्वजनिक शौचालय समोर जि. प. शाळा मल्याण येथे बोरींग मारुन कार्यान्वीत करणे. | रू.५०० | रू.५००० |

**अटी व शर्तीः-**

१. निविदा फॉर्म हे संबंधित विभागात दि २५/३/२०२३ ते ३१/०३/२०२३ रोजी संध्याकाळी ५.०० पर्यंत कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील. व निविदा फॉर्म आवक-जावक विभाग २५/०३/२०२३ दि. ३१/३/२०२३ रोजी संध्याकाळी ४.३० वाजेपर्यंत जमा करावेत. आलेल्या निविदा या मुख्याधिकारी निविदाधारकांच्या समक्ष ३/४/२०२३ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजता किंवा प्रशासकीय सोयीनुसार उघडण्यात येतील.

२. निविदा पोटी इसारा रक्कम लेखा विभागात रोखीने / धनादेशाद्वारे भरुन पावतीची मुळ प्रत लिफाफा क्र. ०१ च्या आत व लिफाफ्यावर अनामत पावतीचा तपशील लिहून लिफाफा क्र. १ व लिफाफा क्र. २ सीलबंद करून निविदा आवक विभागाकडे प्रत्यक्ष दि. ३१/३/२०२३ रोजी संध्याकाळी ४.३० पर्यंत जमा करायची आहे.

३. प्राप्त निविदापैकी कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार नगर परिषदेने राखून ठेवला आहे.

सही/-
मुख्याधिकारी
डहाणू नगरपरिषद